# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

---

**दिनांक ०८.०८.२०२६ शनिवार**

**पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर, परिमंडळ क्र. ४ अंतर्गत कुख्यात गुंड हद्दपार :—**

पोलीस आयुक्तालय, नागपुर शहर, परिमंडळ क्र. ४ अंतर्गत पोलीस ठाणे इमामवाडा हद्यीत **कापला वस्ती, इमामवाडा येथे राहणारा गुन्हेगार इसम नामे कुंदन देविदास चौव्हान वय ३९ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे इमामवाडा येथे गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता इमामवाडा पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ०६/२०२६ दिनांक ०१.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०१ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे. इमामवाडा पोलीसांनी हद्यपार इसमास त्याचे नातेवाईकांकडे आर्वी, जिल्हा वर्धा येथे सोडलेले आहे. नमुद हद्यपार इसम नागपूर शहरात व ग्रामिण हद्यीत दिसून आल्यास डायल ११२ तसेच नजिकच्या पोलीस ठाणे येथे कळवावे.



**हद्यपार इसम कुंदन**

**(कामगिरी)**

**सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्नाचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस अटक.**

फिर्यादी रमेश प्रभुजी खंगार वय ३८ वर्ष रा. प्लॉट क्र. ५०, भरतवाडा चौक, पारडी, नागपूर हे पोलीस ठाणे सिताबर्डी हद्यीत गारमेंट हाऊस दुकान येथील मालकाचे ड्रायव्हर म्हणून काम करतात. दिनांक ०२.०८.२०२६ चे १६.४५ वा. चे सुमारास, मालकाचा मुलगा दुकानाबाहेर गेल्याने, फिर्यादी हे दुकानाचे गेटसमोर बाहेर बसलेले होते. एक अनोळखी इसम दुकानाचे काचेचे गेट उघडून आत गेला व लगेच बाहेर आल्याने फिर्यादीने त्याला काय काम आहे असे विचारले असता, अज्ञात इसमाने त्याचेजवळील शस्त्राने फिर्यादीचे उजवे बोटावर व हनुवटीवर वार करुन जखमी करुन पळून गेला होता. फिर्यादी यांनी उपचार करुन दिनांक ०४.०८.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपींविरूध्द कलम १०९(१),११८(१) भा.न्या.सं. सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्हयाचे तपासादरम्यान पोलीस ठाणे सिताबर्डी येथील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयातील आरोपीस निष्पन्न करुन, गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढून, आरोपी नामे काजी समसुद्दीन उर्फ सोनु काजी बहारुद्दीन वय २८ वर्ष रा. पिली स्कुल समोर, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपूर यास दिनांक ०७.०८.२०२६ रोजी सिताबर्डी हद्दीत संशयीतरित्या फिरतांना ताब्यात घेतले. आरोपीस विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हयाची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयात वापरलेला चाकु जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त परि.क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग), वपोनि सुहास राऊत, दुपोनि मनिष कोल्हाटकर यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि विनोद तिवारी, पोहवा अमित त्रिपाठी, उमेश तसलीकर, पोअं सैयद वाहीद व राहुल भोपळे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे यशोधरानगर :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०८.०८.२०२६ चे ०२.५५ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, तिनखेडे ले आऊट, साई मंदीरजवळ, एका अॅक्टिवा गाडीवर संशयीतरित्या फिरणाऱ्या इसमास थांबविले असता, तो इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल राजु हाटेवार वय २५ वर्षे रा. पंजाबी लाईन, कुंदनलाल गुप्ता नगर, मुन्ना सरदारचे घरासमोर, नागपूर असे सांगीतले. त्याची व वाहनाची झडती घेतली असता, त्याचे अॅक्टिवा क्र. एमएच ४० एपी ४७७३ गाडीचे डिक्कीमध्ये एक लोखंडी धारदार चाकु मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती १,०००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन फिरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.०८.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा नामे अनिकेत चौधरी वय २३ वर्षे रा. सोनेगाव निपाणी, एमआयडीसी, नागपूर हा सोनेगाव निपाणी फाटा, राजपय कंपनीजवळून पायी जात असता, एका हायड्रा क्रेन क्र. एमएच ३१ एफएक्स ५८९१ चे चालकाने त्याचे ताब्यातील क्रेन वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मुलाला धडक देऊन गंभीर दुखापत करून पळुन गेला. गंभीर जखमी यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ०८.०८.२०२६ चे ११.३० वा. डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी दिलीप हरीदास चौधरी वय ४४ वर्षे रा. सोनेगाव निपाणी, एमआयडीसी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे मपोउपनि. सुनिता उमिनवाडे ८७८८००७६३६ यांनी क्रेन चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १८४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे इमामवाडा</u>:—** सौ. कोमल दीपक तुमडाम वय २६ वर्षे, रा. जाटतरोडी क्र. २, इंदीरानगर, इमामवाडा, नागपूर ह्या दिनांक ०२.०८.२०२६ पासुन पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गव्हाळ, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—४ फुट १० इंच, केस— काळे लांब, अंगात— पिवळा शर्ट व काळा प्लाजो घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** स्वप्निल जितेंद्र दहाट वय ४० वर्षे रा. इंदीरानगर, माता मंदीरजवळ, नारा घाट, जरीपटका, नागपूर हे दिनांक २७.०५.२०२६ चे ०६.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ३ इंच, केस—काळे, अंगात— निळा शर्ट व काळा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्हे— उजवे हातावर स्वप्निल व डावे हातावर आर असे गोंदलेले आहे.



सौ. कोमल



स्वप्निल

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा.१५वे सहदिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०५०४४६ /१९९९ | कलम ४०८, ४२० भादंवि | १)नामदेव रावजी हिरुळकर रा. गायत्री नगर, प्लॉट क्र. ३, प्रतापनगर, नागपूर. २)कु. राजश्री चंदु मेश्राम वय ४१ वर्ष रा. प्लॉट क्र. ७४, बॅनर्जी ले आऊट, लकडगंज, नागपूर ३) रंगनाथ काशिनाथ निमजे वय ५८ वर्ष रा. विनोबा भावे नगर, कळमणा, नागपूर ४) रमेश तुलसीराम कांबळे वय | २०.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ४३ वर्ष रा. टिमकी, खाटीकपुरा, तहसील, नागपूर<br>५) सतिश निंबाजी गिरमकर वय ४३ वर्ष रा. मानेवाडा रोड, बिनकर कॉलनी, अजनी, नागपूर | |
| २. | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ४५४० /२०१७ | कलम ३९२, ३२३,४२७, ३४ भादंवि | अंकित उर्फ भुऱ्या राजु गौर, रा. शारदा माता मंदीरजवळ, गणेशपेठ, नागपूर | १२.०८.२०२६ |
| ३. | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४०००८ /२००० | कलम ३(२) | शेख रफीक शेख महबुब रा. भालदारपुरा, देवडीया भवन समोर, गणेशपेठ, नागपूर | १७.०८.२०२६ |
| ४. | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४०२९९ /१९९९ | कलम ३८१ भादंवि | हरनारायण रामसिंग गौर वय ४० वर्ष रा. प्रायमरी शाळेजवळ, गणेशपेठ, नागपुर | १७.०८.२०२६ |
| ५ | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०११५६/ २००७ | कलम १४३, १४७,१४८, ४२७ भादंवि | १) निलेश आर. फासे रा. रा. जाटतरोडी क्र. २, फेंडर चे घराजवळ, नागपुर<br>२) पप्पु उर्फ वाघुर यम बहोरिया वय २० वर्ष रा. १२ सिंगल, बोरकर नगर, नागपूर<br>३) बिंदु उर्फ राजेश बी. बहोरिया वय ४० वर्ष रा. १२ सिंगल, बोरकर नगर, नागपूर ह. मु. जबलपुर गोल बाजार, नॅशनल हायस्कुलजवळ, (म.प्र.)<br>४) आनंद उर्फ पलटन एल. गुजर वय २० वर्ष रा. रा. १२ सिंगल, बोरकर नगर, नागपूर<br>५) राम अ. मसराम राहणार जाटतरोडी क्र. १, मोरेच्या घरी किरायाने, इमामवाडा, नागपूर | ११.०८.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**